# प्रेस नोट

## लातूर जिल्हा पोलीस भरती सन २०२२-२०२३

**दिनांक ०३.०७.२०२४**

---

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस भरती सन २०२२-२०२३ च्या जाहिराती मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय पोलीस शिपाई यांची (३९), पोलीस शिपाई बॅण्डस्मन यांची (०५) व पोलीस शिपाई चालक यांची (२०) पदे भरण्यासाठी पहिल्या टप्यात उमेदवारांची **"शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणी"** ही दिनांक १९.०६.२०२४ ते २८.०६.२०२४ या कालावधीत पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात आली आहे.

चालक पोलीस शिपाई पदासाठीच्या शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणीत उत्तीर्ण होवुन वाहन चालविण्याची कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरलेल्या १:१५ उमेदवारांचे गुणांची तात्पुरती गुणवत्ता यादी दिनांक ०१.०७.२०२४ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळ **www.laturpolice.gov.in** वरती प्रसिद्ध करण्यात येवुन पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील दर्शनी भागावर डकविण्यात आली आहे.

चालक पोलीस शिपाई पदासाठीच्या सदर गुणवत्ता यादीतील उमेदवारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी हि **दिनांक ०४.०७.२०२४ ते ०६.०७.२०२४ या कालावधीत सकाळी ०६.०० वा. पासून पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात येणार आहे.** सदर यादीतील दिनांक ०४.०७.२०२४ रोजी (१२०), दिनांक ०५.०७.२०२४ रोजी (१५५) व दिनांक ०६.०७.२०२४ रोजी (१५६) उमेदवारांना वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीसाठी बोलाविण्यात आले असुन, त्यांना कोणत्या तारखेला हजर रहायचे आहे त्याबाबतची माहिती उमेदवारांना ई-मेलद्वारे, भ्रमणध्वनीवर संपर्क साधुन देण्यात आली आहे. तसेच या कार्यालयाचे वर नमुद संकेतस्थळावर प्रसिद्ध आली आहे. चालक पोलीस शिपाई पदासाठीच्या उमेदवारांनी त्यांना देण्यात आलेल्या तारखेस वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीसाठी सकाळी ०६.०० वा. पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी वेळेत हजर रहायचे आहे. कौशल्य चाचणीसाठी उशिराने येणारे उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

### -:: उमेदवारांना सुचना ::-

१. **उमेदवारांनी कौशल्य चाचणीसाठी येताना शारिरिक चाचणीचे प्रवेशपत्र (Hall Ticket) सोबत घेऊन यावे.**
२. **ओळखपत्र (उदा.आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसेंस इ.) सोबत घेऊन यावे.**
३. **पासपोर्ट साईज ४ फोटो सोबत घेऊन यावे.**
४. **कसल्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साहित्य, मोबाईल, बॅग, किंमती वस्तु घेऊन येण्यास बंदी राहील. आणल्यास ते कोठे ठेवायचे याची सर्वस्वी जबावदारी उमेदवारांची राहिल.**

लातूर जिल्हा चालक पोलीस शिपाई पदासाठीची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी प्रक्रिया ही सी.सी.टि.व्हि. व व्हिडीओ ग्रॉफी च्या निघराणीखाली अतिशय तटस्थपणे, निःपक्षपातीपणे व पारदर्शकरित्या घेण्यात येत असून उमेदवारांने कोणत्याही आमिषास व भुलथापांना बळी पडु नये, कोणाकडुन असे करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची बाब पोलीस अधीक्षक, लातूर, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, पोलीस उप अधीक्षक (मुख्या.), लातूर व पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांना तात्काळ कळविण्यात यावी असे लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत आव्हान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | मोबाईल क्रमांक/दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | पोलीस अधीक्षक, लातूर (पोलीस भरती प्रमुख) | ८२७५०००७७८ (फक्त संदेश करावा) |
| ०२ | अपर पोलीस अधीक्षक, लातूर | ९९२३१३२८२७ |
| ०३ | नियंत्रण कक्ष, लातूर | ०२३८२-२४२२९६ |
| ०४ | पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, लातूर | ०२३८२-२४२६७४ |

तसेच ई-मेल आयडी sp.latur@mahapolice.gov.in वर सविस्तर आक्षेप नोंदविण्यात यावा.

(सोमय मुंडे)
पोलीस अधीक्षक, लातूर

प्रति,

व्यवस्थापक,
दैनिक ......................................................